**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2024: 8.058,**
https://www.srjis.com/issues_data/238
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL, AUG-SEPT 2024, VOL-12/65

# आधुनिकीकरणाचा कोलाम आदिवासी लोकांच्या आरोग्यावरील प्रभाव

**प्रा. विठ्ठल शामराव आत्राम**

*श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राजुरा.*

*Email: - vitthalatram5@gmail.com*

**Paper Received On**: 21 August 2024

**Peer Reviewed On**: 25 September 2024

**Published On:** 01 October 2024

***Abstract***

*मानवी संस्कृतीचा विकास हा सातत्याने होत असून उत्तरोत्तर प्रगती होत असल्याचे दिसून येते. मानवी विकासाच्या प्रारंभिक अवस्थेपासून तर आधूनिक अवस्थेचा इतिहास हा परिवर्तनाचा आहे. म्हणूनच यथार्थाने म्हटले जाते की, 'परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे'. सामाजिक परिवर्तन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. जगामधील सर्वच समुदायामध्ये आधुनिकिकरणाची प्रक्रिया कमी अधिक प्रमाणात म्हणजे गतीभिन्नता असली तरी दिवसेंदिवस तिच्यात वाढ होत आहे. आधुनिकीकरण प्रक्रियेची गतीशिलता शहरी भागात झपाटयाने तर, ग्रामीण भागात शहराच्या तुलनेत कमी आणि आदिवासी समाजात त्यापेक्षा कमी तर आदिवासी समुदायातील कोलामामध्ये तर फारच मंद गतीने प्रवेशित दिसते. परंतु आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही कोलाम या आदिवासी जमातीमध्ये सुध्दा परिवर्तन घडून आणत आहे. आधुनिकीकरणाचा कोलाम समुदायांच्या राहणीमान, बोलीभाषा, खानपान, पेहराव यावर बदल दिसतो. तसाच बदल त्यांच्या आरोग्य दृष्टिकोनातून पडला आहे काय? रोग—रायी, साथीचे आजार पसरल्यास ते पारंपारीक पध्दतीने जादू—टोणा, मंत्र—तंत्राने दुरुस्त करण्याचा प्रयत्न करतात की ते रुग्णालयात जातात? स्त्रीयांची प्रसुती ते घरीच करतात की खाजगी, सरकारी रुग्णालयात करतात? गर्भधारणा झाल्यापासून तर प्रसुती होईपर्यंत ते मातेची व बाळाच्या प्रकृतीबद्दल सोनोग्राफी करतात की नाही? आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने त्यांच्या आयुर्मानात व आरोग्य विषयक बाबतीत प्रगती झाली की कसे? ते किती प्रमाणात आरोग्यविषयक बाबतीत आधुनिकीकरणातील तंत्रज्ञानाशी जुडलेले आहेत. आरोग्यविषयक दर्जा सुधारला की नाही? या सर्व प्रश्नाबाबत माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी दिलेल्या लघु संशोधन प्रकल्प निधी सहायातून करण्यात आला आहे.*

***बीजसंज्ञा*** *:— आधुनिकीकरण, कोलाम समुदाय, आदिवासी, आरोग्य.*

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**प्रस्तावना :—**

प्रामुख्याने भारतातील ब्रिटिश राजवटीपासून कोलाम आदिवासी भागामध्ये हस्तक्षेप सुरु झाले. त्यापूर्वी कोलाम समुदायातील लोक हे स्वतंत्र वस्ती करुन असत. आपल्याच पोडामध्ये राहत. कोलामांच्या वस्तीला ‘पोड’ म्हणतात. ‘पोड’ हा एक स्थानांतरीत शेती करण्याचा प्रकार आहे. कोलाम लोकं हे प्रामुख्याने डोंगर उत्तारावर शेती करतात व त्यांच्या घरालाच लागून शेती असते. म्हणजेच शेतातील गांव या अर्थाने हे ‘पोड’. कोलाम समुदायातील लोकं हे इतर समुदायापासून पूर्णपणे वेगळी वस्ती करुन राहतात. किंबहूना आज सुध्दा जास्त प्रमाणात आपल्या आजूबाजूलना दुसऱ्या समुदायांच्या लोकांना राहू देत नाहीत. ते अलिप्त असतात. परंतु काम—धंदे, मोल—मजूरी करुन जीवनयापन सध्यस्थितीत करावे लागत असल्याने ते आपसूकच इतर समुदायांच्या संपर्कात येवू लागले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कायद्याचे अधिराज्य निर्माण झाल्याने या कोलाम आदिवासी लोकांची इच्छा असतांना व नसतांनासुध्दा इतर लोकांशी संबंध आपसूकच निर्माण झाले. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने प्रभावित होवून जंगल कायद्यांमुळे शिकार व वनोपज वस्तुवरती उदरनिर्वाह करणे दुरापास्त झाले. तसेच उद्योगधंदे, कारखाने, डॅम आदिच्या उभारणीमुळे त्यांना विस्थापित व्हावे लागत असल्याने त्यांचे जीवन पुर्णत: ढवळून निघाले आहे.

पाश्चिमात्य राष्ट्रात, देशात सुरु झालेली औद्योगिकरणाची व आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही संपूर्ण जगातील राष्ट्रात सुरु झाली. यात भारतातील कोलाम आदिवासी समाजसुध्दा अपवाद नाही. आधुनिकीकरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात ना भुतो ना भविष्यती अशी प्रगती साधली गेली. साथीच्या रोगावरती उपाय योजले गेले. प्लेग, कॉलरा या साथीच्या आजारात गावेच्या गावे मृत्युमुखी पडत होती. परंतु वैद्यकीय क्षेत्रातील नेत्रदिपक कामगीरीने या साथीच्या आजारावर आळा घातला गेला. लसीकरणामुळे अनेकांचे जीव वाचू लागले. प्रत्येक व्यक्तींचा या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेवर विश्वास बसू लागला. विषारी प्राणी, साप, विंचू आदिंच्या दंशावरील लसीकरणाने लोकांचे प्राण वाचू लागले. मंत्र, तंत्र, देव, भूत, भानामती यावरील विश्वास कमी होवू लागला. शहरी व ग्रामीण समाजात प्रबोधनाचे वारे पसरु लागले. सुरुवातीला आंधळे होणे पाप समजले जाई. परंतु

ऑप्रेशनने दृष्टी येवू लागली. शहर, गावातील वयस्क अंधत्वदृष्टी मोठया प्रमाणात कमी झाली. सोनोग्रॉफी, एक्सरे मशिन या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे गर्भातच मंतीमंदता, अपंगत्व आदि ओळखून सुदृढ बाळ जन्माला घालण्याची समाजाची मानसिकता बनली. या परिवर्तन घडलेल्या समूहाशी जेव्हा कोलाम समुदायांचे संपर्क आले तसेच आदिवासी समाजातील परधान, गोंड समुदायातील जी मुले डॉक्टर झालीत, ती कोलाम समुदायासाठी आज सोनाग्राफी व वैद्यकीय सुविधा निःशुल्क देवू केल्या. कोरपना, जिवती व राजुरा भागात येरमे डॉक्टर (डॉ. प्रविन येरमे व डॉ. शारदा येरमे/टेकाम) या दांपत्यामुळे या कोलांम लोकांत चैतन्य स्फुरु लागले. आपला माणूस प्रेमाने व मायेने मोफत सेवा देतो. आपले सहृदयाने दवाखान्यात स्वागत होते, कुठलीही भीती नसल्याने कोलाम लोकांचा लोढा तंत्रमंत्र सोडून रुग्णालयात वाढू लागला आहे. त्यामुळे ती आज सामान्य रुग्णालयात येवून तसेच खाजगी दवाखान्यात जावून औषोधोपचार घेत आहेत. परंतु वास्तविकता किती प्रमाणात त्यांच्यात परिवर्तन झाले हे सांगणे फार कठीण आहे. कारण आजही बरेच कोलाम समुदायातील व्यक्ती झाडीपट्टी औषधी, तंत्र—मंत्र, देवधरम यावरच विश्वास ठेवतात. ते वैद्यकीय उपचार करीत नाही. त्यामुळे त्यांची वस्तुस्थिती प्रामाणिकपणे अभ्यासून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणने गरजेचे आहे. तरच ते या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकतील.

**आधुनिकीकरणाचा अर्थ व व्याख्या :—**

१) अलाटस्च्या मते, ''आधुनिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार समाजात केला जातो. ज्यामुळे समाजातील व्यक्तीची पातळी सुधारते आणि समाज चांगुलपणाकडे वाटचाल करते.''[१]

२) डॅनियल लर्नरच्या म्हणण्यानुसार, ''आधुनिकीकरण ही परिवर्तनाची प्रक्रिया आहे, जी मुख्यतः विचार करण्याच्या आणि दृष्टिकोनातील बदलांशी, शहरीकरणामध्ये वाढ, साक्षरतेत वाढ, दरडोई उत्पन्न आणि राजकीय सहभाग वाढीशी संबंधित आहे.''[२]

आधुनिकीकरणाचा शहरी, ग्रामीण तसेच आदिवासी आरोग्यावर चांगला परिणाम झाला आहे. वैद्यकीय उपचारपध्दतीत नावीन्य वाढले आहे. आधुनिक यंत्रे, उपकरणे आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने आरोग्य क्षेत्रातील विकासास मदत झाली

आहे. या सर्वांमुळे मृत्यु दरात घट, बालमाता मृत्युचे प्रमाण कमी होत आहे, आयुर्मानात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच या आधुनिकीकरणाच्या प्रवाहात कोलाम आदिवासी समाज येत असल्याने त्यांच्यात सुध्दा आरोग्य विषयकबाबी संबंधाने विकास होत आहे.

**पूर्व संशोधनाचा आढावा :—**

१. **भाऊ मांडवकर यांच्या 'कोलाम'** या १९६६ साली प्रकाशित, गाजलेल्या दुर्मिळ ग्रंथामध्ये कोलाम समुदाय हा कसा आधुनिकीकरण या प्रक्रियेपासून अलिप्त असून तो प्रथा, परंपरा यात गुरफटलेला आहे हे पुढिलप्रमाणे अधोरेखित करतात.

''प्रत्यक्ष रोगराईने मृत्यु येतो, या गोष्टीवर कोलामांचा विश्वास नाही. एखाद्या देवाच्या प्रकोपाने रोग येतात, म्हणजेच 'देवाच्या करणी'ने लोक मरतात, असे ते मानतात. बहुतेक लोक देवाच्या कोपाने, बाहेरचा देव किंवा भूत 'लागल्या'ने अथवा जादूटोणा केल्याने मरतात, ही त्यांची मनोमन धारणा आहे.''[३]

पुढे ते म्हणतात. ''माता—रोगाची साथ आल की 'आया' या देवतेची पूजा करतात. पटकी आल्यास लोक पटापट मरतात आणि तरीही ते इतर अडाण्यांप्रमाणे देवीलाच पूजत राहतात. नांझा ता. जि. यवतमाळ येथे कोलामांचे सहा 'पोड' आहेत. त्यांतील 'गव्हाणकडी पोड' ३०—३५ घरांचा होता. परंतु मध्ये एकदा कॉलरा आला व सुमारे २५ घरांतील बहुतेक कोलाम पटापट मरुन गेले. प्रेतांची दुर्दशा झाली. त्यांची विल्हेवाट लावणे कठीण गेले. आता त्या 'पोडा'वर फक्त चार घरे उरली आहेत. त्या साथीच्या वेळी काही घरे दुसरीकडे वस्तीला गेली.''[४]

२. **डॉ. सुधा मुरलीधर खडके** यांनी त्यांच्या 'कोलाम आदिवासी जीवन' या पुस्तकांमध्ये कोलाम आदिवासी लोकांच्या मागासलेपणाबद्दल लिहितात.

''नैसर्गिक आपत्ती व देवीचा कोप, रोगराई यापासून संरक्षण करण्याकरीता देवी—देवतांना प्रसन्न करण्याकरीता पोडाची गावबांधणी करतात.''[५]

पुढे ते नमुद करतात की, ''भगत हा त्यांचा वैद्य असतो. तो सांगेल त्याप्रमाणे मंत्र—तंत्र, गंडे—दोरे असे प्रकार करण्यास कोलाम लोक तयार होतात. रोगराई आली की देवाला कोंबडीचा नवस करावा असे भगत सांगतो.''[६]

वरील संशोधीत विवेचनावरुन कोलाम आदिवासी लोकांच्या जीवनात, अंधश्रध्दा, प्रथा व परंपराचा पगडा असलेला दिसतो. परंतु आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे कोलाम आदिवासी समुदायांच्या जीवनात विविध अंगानी खूप मोठे बदल होत आहेत. आधुनिकीकरणामुळे कोलाम आदिवासी लोकांच्या आरोग्यावर कोणता परीणाम झाला याबाबत पुरेसे उपयुक्त संशोधन झाले आहे; असे संशोधकाला आढळलेले नाही. त्यामुळे संशोधकाने प्रस्तुत संशोधनाचे कार्य हाती घेतले आहे. आधुनिकीकरणाचा कोलाम आदिवासी लोकांच्या आरोग्यावर कोणता परिणाम झाला याबाबत शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :—**

१. आधुनिकीकरणाचा कोलाम या आदिवासी समुदायांच्या आरोग्यावर पडलेला प्रभाव जाणून घेणे.
२. आधुनिकीकरणांमुळे कोलाम या आदिवासी समुदायांच्या आरोग्यविषयक दर्जा, प्रगतीआलेख तपासणे.
३. कोलाम या आदिवासी समुदायांचा आरोग्यविषयक दर्जा कसा उंचावता येईल यावर उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :—**

या शोधनिबंधासाठी प्राथमिक साधनांचा ज्यात मुलाखत अनुसूची, सहभागी निरीक्षण, याचा वापर केला. तसेच दुय्यम साधनांचा जसे, संदर्भ ग्रंथ, मासिक, वर्तमानपत्र व ऑनलाईन उपलब्ध माहितीचा समावेश केला.

**गृहितकृत्य :—**

१. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने कोलाम आदिवासी लोकांचा आरोग्य विषयक दर्जा सुधारत आहे.
२. कोलाम आदिवासी समुदायातील लोकं आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होत आहेत.

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**माहितीचे संकलन व विश्लेषण :—**

संशोधनकर्त्याने आधुनिकीकरणाचा आदिवासी लोकांच्या आरोग्यावरील प्रभाव या विषयावर अध्ययन करण्यासाठी एकूण १०० उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूची भरुन माहीती गोळा केली. प्राप्त झालेल्या तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करुन त्यांचे सारणीकरण आणि आलेख तयार करण्यात आले. त्याआधारे माहितीचे विश्लेषण व निष्कर्ष काढले. आदिवासी समाजातील लोकांच्या आरोग्यावर आधुनिकीकरणाचा प्रभाव कसा आहे? त्यांच्या आरोग्य विषयक समस्या कितपत सुटल्या? आयुर्मानाचा विकास कसा व कितपत झाला आहे याचे परीक्षण केले आहे.


**सारणी क्र. १**

**उत्तरदाते आजार / रोग निवारणासाठी कोणत्या उपचार पध्दतीचा वापर करतात?**

**आजार /रोगनिवारण उपचार पध्दत दर्शक सारणी**

| अ. क्र. | तुम्ही आजार / रोग निवारणासाठी कोणत्या उपचार पध्दतीचा वापर करता? | वारंवारीता | | शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही |
| १ | पारंपारीक वन औषधी, वनस्पती | ८८ | १२ | ८८.०० | १२.०० |
| २ | भगत /शामन | ७२ | २८ | ७२.०० | २८.०० |
| ३ | कुलदेवती पूजा | ९७ | ०३ | ९७.०० | ०३.०० |
| ४ | डॉक्टर /दवाखाने | ६८ | ३२ | ६८.०० | ३२.०० |
| ५ | वरील सर्व | २७ | ७३ | २७.०० | ७३.०० |

संशोधकाने उत्तरदात्यांना तुम्ही कोणत्या उपचार पध्दतीचा वापर करता? असा प्रश्न केला असता, पारंपारीक वनौषधी, वनस्पती असे १०० पैकी ८८ उत्तरदात्याने म्हटले. तर भगत /शामन यांचेकडे जातो असे ७२ इतके उत्तरदात्यांनी म्हटले. कुलदेवती पूजा करतो म्हणणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त ९७ इतकी आहे. तर डॉक्टर /दवाखाने यात उपचार करतो म्हणणारे उत्तरदाते ६८ इतके आहे. तर वरील सर्व उपचार करतो म्हणणाऱ्यांची संख्या २७ इतकी आहे.




वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, कोलाम आदिवासी लोक हे आजार/ रोगनिवारण करण्यासाठी पारंपारीक वन औषधी, वनस्पती यांचा वापर मोठया प्रमाणात करतात. तसेच त्यांचा त्यांच्या समुदायातील भगतावरही विश्वास आहे. जादु—टोणा, भुत—प्रेत, देव—धरम करण्यासाठी ते भगताचा सहारा घेतात. तसेच कुलदेवतांची पुजा तर त्यांचा जीव की प्राण आहे. म्हणूनच सर्वात जास्त आजार/ रोगनिवारणासाठी प्रथम ते पुजा करतात. आम्ही करत नाही असे म्हणनारे नगन्य होते व तेही मनातून खरे उत्तर सांगत आहेत असं उत्तर देतांना त्यांच्या हावभावावरुन वाटत नव्हते. आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे बरेचदा पारंपारीक उपचार, तसेच वर दर्शविलेले सर्व उपचार करुन उपयोग झाला नाही तरच ते रुग्णालयाचा, दवाखान्याचा पर्याय निवडतात. परंतु त्यांच्यात आजार/ रोग निवारण करण्यासाठी रुग्णालयात येण्याचे प्रमाण वाढत असलेले दिसून येत आहे. वरील सर्वच उपचार करणारांची संख्या पण बऱ्याच प्रमाणात आहे.

वरील सारणी व तक्ता यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कोलाम आदिवासी लोक पारंपारीक पध्दतीने वनऔषधीने, भगत याद्वारे, कुलदेवतेची पुजा करुन आजार बरा न झाल्यास शेवटचा पर्याय म्हणून दवाखाने वा रुग्णालयात येत असले तरी, रुग्णालयातून रोग/ आजार बरे होण्याचे प्रमाण वाढत असल्याने त्यांचे साथीचे आजार वा इतर अनेक आजारात डॉक्टरकडे, रुग्णालयात येण्याचे प्रमाण वाढत आहे.

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*


**सारणी क्र. २**

**उत्तरदाते गर्भवती स्त्रीची सोनोग्रॉफी करतात काय?**

**सोनोग्रॉफीचा वापर दर्शक सारणी**

| अ.क्र. | तुम्ही गर्भवती स्त्रीची सोनोग्रॉफी करतात काय? | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २४ | २४.०० |
| २ | नाही | ६९ | ६९.०० |
| ३ | सांगता येत नाही | ०७ | ०७.०० |
| | **एकूण** | १०० | १००.०० |

वरील सारणीतील आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, फक्त २४ कोलाम आदिवासी लोकांनी त्यांच्या कुटुंबातील गर्भवती स्त्रीयांच्या सोनोग्रॉफी करतात. तर सोनोग्रॉफी करीत नाही म्हणणारांची संख्या सर्वात जास्त ६९ इतकी होती. सोनोग्रॉफी नेमकी काय आहे, माहित नाही सांगता येत नाही असे म्हणणारांची संख्या ही ०७ होती.




वरील सारणी व तक्त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कोलाम आदिवासी समुदायामध्ये त्यांच्या बहुसंख्य गर्भवती स्त्रीयांच्या सोनोग्रॉफी नियमित केल्या जात नाही. अनेक लोकांना सोनोग्रॉफी म्हणजे काय भानगड असते हे माहित नाही.

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**सारणी क्र. ३**

**उत्तरदाते गर्भवती स्त्रीची सोनोग्रॉफी करत नसल्यास कारणे काय?**

**सोनोग्रॉफीचा वापर करत नसल्याबाबत कारण दर्शक सारणी**

| अ. क्र. | तुम्ही गर्भवती स्त्रीची सोनोग्रॉफी का करत नाही? | वारंवारीता | | शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही |
| १ | रुग्णालयात नेवून काही फायदा होत नाही. | १८ | ८२ | १८.०० | ८२.०० |
| २ | रुग्णालयात नेण्याकरीता दळवळणाची साधणे नाहीत. | ७८ | २२ | ७८.०० | २२.०० |
| ३ | जवळपास रुग्णालये नाहीत. | ६६ | ३४ | ६६.०० | ३४.०० |
| ४ | डॉक्टर बरोबर सांगत नाहीत, हेळसांड करतात. | ८२ | १८ | ८२.०० | १८.०० |
| ५ | वरील सर्व | १९ | ८१ | १९.०० | ८१.०० |

वरील सारणीतील आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, रुग्णालयात नेवून काही फायदा होत नाही असे म्हणणारे लोकं १८ आहे. रुग्णालयात नेण्याकरीता दळवळणाची साधणे नाहीत म्हणणारांची संख्या ७८ इतकी आहे. तर जवळपास रुग्णालये नाहीत म्हणणारांची संख्या ६६ इतकी होती. तर डॉक्टर बरोबर सांगत नाहीत, हेळसांड करतात असे म्हणाणारांची संख्या सर्वात जास्त ८२ इतकी आहे. तसेच वरील सर्व कारणे आहेत असे म्हणणारे फक्त १९ आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्ष निघते की, कोलाम आदिवासी बहुसंख्य लोकांना जरी सोनोग्राफीचे महत्व कळले असले, फायदा असला तरी दवाखाने त्यांच्या भागात नजीक नसल्याने, त्यांच्याकडे रोड, रस्ते, दळणवळणाच्या सोयी सुविधा नसल्याने, तसेच शहरातील डॉक्टरकडे त्या लोकांचे स्वागत होईलच असे नाही, बरेचदा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते, सहकार्य केले जात नाही. त्यामुळे ते वैद्यकीय सोयी, सुविधांपासून वंचित व उदासीन राहत असल्याचे दिसते.

Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language


**सारणी क्र. ४**

**उत्तरदात्यांच्या गावातील स्त्रीयांची प्रसुती कुठे केली जाते?**

**प्रसुती ठिकांण दर्शक सारणी**

| अ.क्र. | तुम्हच्या गावातील स्त्रीयांची प्रसुती कुठे केली जाते? | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | रुग्णालयात | ०९ | ०९.०० |
| २ | गावातच स्वत:च्या घरी | ८९ | ८९.०० |
| ३ | घराला लागलेल्या चाफ्यात | ०२ | ०२.०० |
| | **एकूण** | १०० | १००.०० |

वरील सारणीतील आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, फक्त ०९ कोलाम आदिवासी लोकांनी त्यांच्या कुटुंबातील स्त्रीयांच्या प्रसुती रुग्णालयात केल्या. तर गावातच स्वत:च्या घरी म्हणणारांची संख्या सर्वात जास्त ८९ इतकी आहे. तर घराला लागलेल्या चाफ्यात असे म्हणणारांची संख्या अत्यल्प ही ०२ आहे.




वरील सारणी व तक्त्यावरुन असे निष्कर्ष निघते की, कोलाम आदिवासी लोकं हे बहुसंख्येने गावातच आपल्या स्त्रीयांची प्रसुती करीत असतात. त्यांच्याच समुहातील अनुभवी वृध्द स्त्री 'सुईनबाई' तीच्या मदतीने प्रसुती करीत असतात. रुग्णालयात डिलीवरी

करण्याचे प्रमाण खुपच कमी असून आता शिक्षणाच्या प्रवाहात येत असलेली नवीन मंडळी आपल्या पत्नीची प्रसुती ही रुग्णालयात करतांना दिसून येतात.


**सारणी क्र. ४**

**उत्तरदात्यांचा जादू—टोण्यावर विश्वास आहे काय?**

**जादू—टोणा विश्वास दर्शक सारणी**

| अ.क्र. | तुम्हचा जादू—टोण्यावर विश्वास आहे काय? | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८७ | ८७.०० |
| २ | नाही | ०९ | ०९.०० |
| ३ | ही चुकीची धारणा आहे. | ०४ | ०४.०० |
| | **एकूण** | १०० | १००.०० |

वरील सारणीतील आकडेवारीनुसार कोलाम आदिवासीं लोकांचा जादू टोण्यावर विश्वास असणा—यांची संख्या ही ८९ आहे. तर विश्वास नसणाऱ्यांची संख्या ही ०९ इतकी आहे. तर जादू—टोणा ही धारणा चुकीची आहे म्हणणारांची संख्या फक्त ०४ इतकी आहे.



वरील सारणी व तक्त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कोलाम आदिवासी लोकांचा जादू—टोणा यावर प्रचंड विश्वास असून ते आपल्या भगताद्वारे तंत्र—मंत्राचा वापर करुन आजार / रोग निवारण करण्याचा प्रयत्न करतात.

वरील सर्वांचे सार लक्षात घेता असे दिसून येते की, कोलाम आदिवासी समुदायांमध्ये आधुनिकीकरणाचा, तंत्रज्ञानाचा, वैद्यकीय बाबींचा वापर हा मर्यादीत होत असून त्यांच्या आरोग्य विषयक समस्या या गंभीर स्वरुपाच्या दिसून येतात. बरेच मंडळी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर हा आरोग्यविषयक बाजूनी करीत असले तरी त्यांचे प्रमाण हा अत्यल्प आहेत. त्यांचे विपरीत परीणाम त्यांच्या आरोग्यावर होत आहेत.

**निष्कर्ष :—**

कोलाम आदिवासी लोक पारंपारीक पध्दतीने वनऔषधीने, भगत याद्वारे, कुलदेवतेची पुजा करुन आजार बरा न झाल्यास शेवटचा पर्याय म्हणून रुग्णालयात जातात. त्यांच्या बहुसंख्य गर्भवती स्त्रीयांच्या सोनोग्रॉफी नियमित केल्या जात नाहीत. अनेक लोकांना सोनोग्रॉफी म्हणजे काय भानगड असते हे माहित नाही. त्यामुळे मतीमंद मुले, अपंग मुले, कुपोषीत मुले जन्मास येतात. बरेचदा गर्भाची योग्य वाढ व विकास न झाल्यामुळे बाळास व मातेसही प्राणास मुकावे लागते. गावातच आपल्या स्त्रीयांची प्रसुती करतात. त्यांच्याच समुहातील अनुभवी वृध्द स्त्री 'सुईनबाई' तीच्या मदतीने प्रसुती करीत असतात. रुग्णालयात प्रसुती करण्याचे प्रमाण खूपच कमी असून आता शिक्षणाच्या प्रवाहात येत असलेली नवीन मंडळी आपल्या पत्नीची प्रसुती ही रुग्णालयात करतांना दिसून येतात. आधुनिकीकरणाचा, तंत्रज्ञानाचा, वैद्यकीय बाबींचा वापर हा मर्यादीत होत असून त्यांच्या आरोग्य विषयक समस्या या गंभीर स्वरुपाच्या दिसून येत आहेत. बरेच मंडळी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा आरोग्यविषयक बाजूनी करीत असले तरी त्यांचे प्रमाण हा अत्यल्प आहे. त्यांचे विपरीत परीणाम त्यांच्या आरोग्यावर होत आहेत. त्यामुळे या कोलाम आदिम समुदायाला आरोग्यासंबंधीत वेळीच जागृत करणे गरजेचे आहे. खालील प्रकारे दर्शविण्यात आलेल्या शिफारशी योग्य प्रकारे कार्यान्वीत केल्या तर उक्त समस्या सोडविण्यात निश्चित यश मिळेल, या समस्येचे गंभीर स्वरुप बदलेल अशी आशा आहे.

**शिफारशी :—**

१) आरोग्यासंबंधाने आधुनिक तंत्रज्ञान व मोफत वैद्यकीय सुविधा यांची कोलाम आदिवासी लोकांना योग्य माहिती दिली जावी.

२) अंधश्रध्दा निर्मूलन यासंबंधाने मार्गदर्शन या समुदायाला दिला जावा.

३) त्यांच्या गावाच्या नजीक वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाव्यात.

४) रुग्णालयातील नातेवाईकांना रुग्णासोबत राहण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

५) कोलाम आदिवासी समुहातील प्रसुती करणाऱ्या स्त्रीयांना आरोग्य सेविका म्हणून मोफत प्रशिक्षण देवून तीला प्रशिक्षीत करावे व मानधन द्यावे.

६) भगत म्हणून कार्य करणाऱ्या व्यक्तींना सुध्दा आरोग्य संबंधाने वैद्यकीय बाबींचे प्रशिक्षण देवून अंधश्रध्दा निर्मूलन जागृती त्यांच्यात करणे व त्यानुसार कार्य केल्यास विशेष प्रोत्साहन मानधन द्यावे.

**संदर्भ :—**

*श्रीमती सुनीता पन्द्रो, ''अनुसूचित जमातीवरील सामाजिक परिवर्तनाचा प्रभाव'', हिस्टेरीकल रिसर्च जर्नल, व्हॅल्युम—३, इश्यु—१, सप्टेंबर—२०१६, पृष्ठ क्र. २.*

*https://www.youthkiawaaz.com/2017/08/dayamani-barla-a-tribal-activist-and-iron-lady-of-jharkhand/*

*भाऊ मांडवकर, 'कोलाम' १९६६ साली प्रकाशित, गाजलेल्या दुर्मिळ ग्रंथाची व्दितीयावृत्ती. पृष्ठ क्र. २८४*

*कित्ता. पृष्ठ क्र. २८५*

*डॉ. सुधा मुरलीधर खडके/कडू, 'कोलाम आदिवासी जीवन', प्रशांत पब्लिकेशन, पृष्ठ क्र. १४०*

*कित्ता. पृष्ठ क्र. १४१*

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*